नि.दि.दा.क्र. १६/२०१५ मधील नि.क्र. ६५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ ने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये कैफियत दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे. सदरच्या अर्जास वादीने म्हणणे देवून विरोध दर्शविला आहे.

२. प्रतिवादी क्र. २ च्या कथनानुसार त्याने नि. ३६ येथे दाखल केलेल्या कैफियतीमध्ये परिच्छेद क्र. ३ व ८ मध्ये अनावधानाने व हस्तदोषाने दोन शब्द घालावयाचे राहून गेले होते. त्या अनुषंगाने कैफियत परिच्छेद क्र. ३ मध्ये तेराव्या ओळीत या शब्दा पुढे ‘ व ताबा ’ असे शब्द लिहून तसेच कैफियत कैफियत परिच्छेद क्र. ५ मध्ये पान क्र. ३ वर तेराव्या ओळीत १/३ हिस्सा या शब्दानंतर ‘ कै.सत्यभामा हिचेकडून स्वतःचे ’ असे शब्द लिहून कैफियत दुरुस्त करणेची परवानगी मिळणेची विनंती केली आहे. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपामध्ये किंवा प्रतिवादीचे बजावामध्ये कोणताही बदल होणारा नाही. दाव्यात उलट तपास अदयाप सुरु झाालेला नाही. सदरच्या दुरुस्तीमुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादीला सदरच्या दुरुस्तीवर पुरवणी सरतपास किंवा वाढीव कागदपत्रे हजर करता येवू शकतील. उलट कैफियत दुरुस्ती नामंजूर झाल्यास मजुरातील तांत्रिक उणिवांचा गैरफायदा वादी घेण्याची शक्यता आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे कोणतेही नवीन मुद्दे काढावे लागणार नाहीत. सदरच्या दुरुस्तीमुळे न्यायदानास मदतच होणार आहे. सबब, नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व गुणवत्तेवर बाजु मांडण्याची प्रमाणिक संधी मिळावी म्हणून प्रतिवादीची कैफियत दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेची विनंती प्रतिवादी क्र. २ ने केली आहे.

३. वादीच्या कथनानुसार दावाची अंशतः सुनावणी झाली असून दावा चौकशीसाठी प्रलंबित आहे. प्रतिवादी हा वारंवार या दाव्यासंदर्भात न्यायालयात

आलेला आहे. त्यामुळे अर्जात नमुद केलेले कारण हे खोटे व खोडसाळ आहे. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

४. प्रतिपक्षांच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित होतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह त्यापुढे देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी मागणी केल्यानुसार दुरूस्ती करू शकतो काय ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## **<u>का र ण मी मां सा</u>**

५. वादी व प्रतिवादी यांचे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दोन्ही बाजूंचे म्हणणे, कागदपत्रे व एकंदरीत वस्तुस्थिती विचारात घेता सदरचा दावा हा दावा मिळकतीचे वाटपासाठी व मनाईसाठी दाखल केलेला आहे.

६. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. २ याने निशाणी क्र. ३६ येथे दाखल केलेल्या कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन मागत आहे. प्रतिवादींनी दाखल केलेल्या निशाण क्र. २९ व ३६ येथे कैफियती पाहता प्रतिवादी क्र. २ याने त्याची कैफियत निशाण क्र. २९ येथे दाखल केलेली असून प्रतिवादी क्र. १ याने निशाण क्र. ३६ येथे कैफियत दाखल केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ हा प्रतिवादी क्र. १ याने दाखल केलेल्या नि. ३६ येथे कैफियतीमध्ये दुरुस्ती करुन मागत आहे. अशी दुरुस्ती

प्रतिवादी क्र. २ यास मागता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे. करिता मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देवून पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येत आहे.

( श्रीमती एन.बी.घाटगे )
दिनांक : १५/०२/२०२४. दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, देवगड.